Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

Original Article

# छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषीविषयक विचार

**प्रा.चंद्रशेखर नामदेव गौरकार[1], डॉ.जे.एम.काकडे[2]**
[1]संशोधक, डॉ.खत्री महाविद्यालय,चंद्रपूर
[2]मार्गदर्शक, प्राचार्य डॉ.खत्री महाविद्यालय,चंद्रपूर
**Email:** gaurkarshekhar@gmail.Com

**Manuscript ID**:
JRD -2025-171231
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 12(A)
Pp. 143-146
December 2025
**Submitted:** 30 Nov. 2025
**Revised:** 15 Dec. 2025
**Accepted:** 26 Dec. 2025
**Published:** 31 Dec. 2025

***सारांश***

*छत्रपती शिवाजी महाराजांकडे विशेष काही नसतांना इतक मोठ साम्राज्य निर्माण केल कस?जे २१ व्या शतकात सुद्धा प्रजाप्रिय आहे.यामागे कोणता आर्थिक,सामाजिक,राजकीय हेतू होता तसेच आर्थिक विचार,नीती,धोरण काय होती? यांचे संपूर्ण जगाला कुतुहल आहेच,पण अभ्यासक,विचारवंत,राज्यकर्ते,धोरणकर्ते यांना विचार करायला लावणारा प्रश्न सुध्दा आहे.या प्रश्नाच उत्तर म्हणजे रयतेच्या कष्टाला व विश्वासाला न्याय देत शाश्वत व सर्वसमावेशक कल्याणाची निर्मिती होय.स्वराज्याची रयत ही शेतकरी असल्याने स्वराज्याचा आर्थिक,सामाजिक,राजकीय आधार सुद्धा शेती आणि शेतकरी हाच होता.शेतकरी सुखी तर रयत सुखी,रयत सुखी तर राज्य सुखी राज्य सुखी तर शेतकरी सुखी असे विचार छत्रपती शिवाजी महाराजांचे होते.म्हणूनच महाराजांनी स्वराज्यात शेतीविषयक धोरण राबवितांना शेतकरी हिताचे धोरण राबविले.जमिनीची मोजणी करून शेतकऱ्यांना जमिनीचा कायमस्वरूपी वारसाहक्क दिला.ज्यांच्याकडे जमीन नव्हती पण जमीन कसायची होती त्यांना महाराजांनी जमीन दिली. दुष्काळ,युद्ध किंवा शत्रूच्या आक्रमणात शेतीचे नुकसान झाल्यास शेतसारा माफ केला जात होता.शेतकऱ्यांच्या गरजेनुसार सरकारकडून बी-बियाणे,शेतीचे अवजारे,बैल खरेदी करण्यासाठी अल्प दराने कर्ज दिले जात होते. शेतकरयांच्या सोईनुसार कर्ज परत करण्याची सोय होती. जमीनदार,भाट,सरदार,पाटील अशा व्यक्तींकडून शेतकऱ्यांची आर्थिक लुट होऊ नये या करिता शेतीचा कारभार पाहण्यासठी अमात्य स्तरावर स्वतंत्र कारभारीची नेमणूक केली होती.अशा कृषिविषयक विचार व धोरणामुळे कृषी क्षेत्राच्या विकासासाठी पोषक वातावरण तयार होऊन कृषी क्षेत्राचा विकास घडून येऊन स्वराज्याचा विस्तार व आर्थिक स्थिरता निर्माण होण्यास मदत झाली.छत्रपतींचे विचार हे शेतकरी हिताचे होते म्हणूनच ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे ठरले.*

***बीज शब्द:*** *कृषी,रयत,धोरण,शाश्वत,सर्वसमावेशक*

## प्रस्तावना

आज इतिहास साक्षी की छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव लोककल्याणकारी राजा म्हणून अजरामर झाले आहे. कारण सदैव रयतेच्या सर्वांगीण कल्याणाचा विचार करून त्या अनुषंगाने सतत व सर्वसमावेशक धोरणांची अंमलबजावणी महाराजांनी काटेकोरपणे केली.महाराजांची रयत प्रामुख्याने कृषिप्रधान असल्याने स्वराज्याचा आधार किंवा केंद्रबिंदू हा शेतकरी व शेती हाच होता.शेतकर्यांच्या हितासाठी भयमुक,शोषणमुक्त अशा धोरणांची निर्मिती केली.आपल्या सैन्याला स्पष्ट आदेश दिला की शेतकर्यांना अजिबात त्रास होणार नाही असे वागावे.महाराजांनी अण्णाजी दत्तो यांच्याकून स्वराज्यातील जमिनीची मोजणी करून न्यायपूर्ण करप्रणाली अंमलात आणली होती.कर वसूल करतांना कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून शेतकर्यांचे शोषण होणार नाही याची दक्षता घेतली जात होती. शेती क्षेत्रात रोजगार निर्मिती व शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी गाव तिथे तलावाची निर्मिती केली.दुष्काळ किंवा शत्रूंच्या सैनिकांकडून पिकांचे नुकसान झाल्यास सरकारकडून तत्काळ मदत केली जात होती.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.चंद्रशेखर नामदेव गौरकार, संशोधक, डॉ.खत्री महाविद्यालय, चंद्रपूर*

**How to cite this article:**
*गौरकार, . चंद्रशेखर . नामदेव ., & काकडे, . जे . एम . (2025). छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषीविषयक विचार. Journal of Research and Development, 17(12(A)), 143–146. https://doi.org/10.5281/zenodo.18212218*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18212218
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

तसेच शेतकऱ्यांना शेतीच्या विविध कामासाठी कर्जाची गरज पडल्यास सरकारकडून कर्जाची उपलब्धता करून दिली होती.शिवछत्रपतींनी विविध कृतीतून निर्माण केलेल्या कार्याच्या आधारे सध्याच्या राज्यकर्त्यांनी राज्यकारभार केल्यास जनता सुखी व समाधानी होऊ शकते.प्रस्तुत संशोधनपर लेखात शेतकरी कल्याणाचा शिवकल्याणकारी विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१ ) छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषीविषय विचार समजून घेणे.
२ ) महाराजांनी स्वराज्यात लागू केलेल्या कृषीविषय धोरणांचा अभ्यास करणे.
३) महाराजांनी शेतकऱ्यांना दिलेल्या सवलती व संरक्षणाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके**

१ ) छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषि विषय विचार कृषी क्षेत्राच्या विकासाला फायदेशीर आहे.
२) महाराजांनी उभारलेल्या स्वराज्याचा आर्थिक पाया कृषी केंद्रित धोरणांवर आधारित आहे.
३) महाराजांनी शेतकऱ्यांना दिलेल्या सवलती व संरक्षणामुळे स्वराज्याला आर्थिक स्थिरता प्राप्त झाली.

**संशोधनाची पद्धत**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्रामुख्याने ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर तसेच प्राथमिक आणि द्वितीयक सामुग्रीचा वापर केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कृषीविषयक विचारांत खालील बाबींचा समावेश होतो.

**कृषीविषयक मुख्य विचार :**

**शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण:**

शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी शेती कसणाऱ्यांना शेती,बी-बियाणे,बैल आवश्यक ती आर्थिक मदत पुरवण्याचे आदेश दिले होते. महाराजांनी प्रभावलीचे शुभेदार रामजी अनंत यांना ५ सप्टेंबर १६७६ रोजी लिहिलेल्या या आदेश पत्रात सांगितले की जे शेतकरी निष्क्रिय आहेत अशा शेतकऱ्यांना शेतीची अवजारे तसेच धान्य देऊन शेती कसण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. ज्या शेतकऱ्यांना व्याजाने कर्ज दिले असतील तर ते बिनव्याजी कर्ज समजून हळूहळू वसूल करावे.दुष्काळ किवा इतर संकटामुळे जमीन नापीक झाल्यास कर माफी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला.ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्यापासून संरक्षण मिळाले याचे परिणाम स्वरूप शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण झाले.

**कृषीविषयक सुधारणावादी विचार :**

पाटील,जागीरदार तसेच वतनदारांच्या शोषणकारी प्रथा रद्द करून महाराजांनी रयतवारी पद्धत सुरु केली.जागीरदार किंवा वतनदारांकडून शेतकऱ्यांचे शोषण होऊ नये या करीता त्यांचे किल्ले व वाडे पाडून त्यांना सामान्य रयतेप्रमाणे राहण्यास भाग पाडले.स्वराज्यात भ्रष्टाचार होऊ नये म्हणून सावकार किंवा वतनदारांना निश्चित रक्कम देऊन त्यांच्यावर प्रशासकीय नियंत्रण ठेवले.समकालीन मुघल व आदिलशाही राज्यांमध्ये अती कर लादून शेतकऱ्यांची लूट केली जात होती.त्यामुळे तेथील शेतकरी उध्वस्त झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकरयांच्या व रयतेच्या कल्याणासाठी तसेच स्वराज्याच्या उभारणीसाठी कर व जमीन महसूल धोरणात महत्वाच्या सुधारणा केल्या होत्या.यामध्ये रयतवारी पद्धतीची अवलंबबजावणी,जमीनची मोजणी,कराचे योग्य व अल्प प्रमाण,संकटकालीन मदत म्हणजेच तगाई आणि सावकार,जमीनदार,पाटील व जहागीरदार यांच्या शोषणापासून शेतकऱ्यांचे संरक्षण इत्यादीचा समावेश होता.

**जमिनीची मोजणी :**

महाराजांनी अण्णाजी दत्तो यांच्याकडून 'काठी' हे अचूक मोजमाप वापरून स्वराज्यातील शेत जमिनीची शास्त्रशुध्दपणे मोजणी आणि प्रतबंदी करून घेतली.स्वराज्यातील प्रचितगड,राजापूर,रायगड,सुवर्णदुर्अंजनवेल,रत्नागिरी व विजयदुर्ग या परिसरातील प्रत्येकी दोन गावांची निवळ करून येथील उत्पन्नाचा वार्षिक तीन वर्षांचा अंदाज काढण्यात आला.

**करप्रणाली :**

महाराजांनी जमिनीचे मोजमाप करून शेती क्षेत्राचे उत्तम व्यवस्थापन केले.भात आणि ताग हे पिक घेणाऱ्या जमिनीचे एकूण १२ गटात विभाजन करण्यात आले होते.अव्वल ही प्रथम प्रत, दुय्यम- द्वितीय,सिम-तृतीय तर चार सिम ही चतुर्थ प्रत.प्रथम प्रतीसाठी १२ मन,द्वितीय प्रतीसाठी १० मन,तृतीय प्रतीसाठी ८ मन व चतुर्थ प्रतीसाठी साडेसहा मन या प्रमाणे शेतसारा निश्चित करण्यात आला.

शेती वर कर लावतांना उत्पन्नाचे एकूण पाच भाग केले.यातील शेतकऱ्यांना तीन भाग तर स्वराज्याला दोन भाग अशी विभागणी केली.हे कर जमा करतांना धान्य किंवा रोखीने जमा करण्याची शेतकऱ्यांना सोय होती. जुन्या जमीन महसूलाच्या ५०-६६ टक्के कराच्या जागी छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्याच्या एकूण शेती उत्पन्नाच्या फक्त १/३ किंवा २/५ भाग इतका कर लावला होता.दुष्काळ,पूर किंवा युद्धाच संकट अशा परिस्थितीमध्ये कर पूर्णपणे माफ केला जात जाई किंवा काही प्रमाणात सवलत दिली जात होती.कोणत्याही प्रकारची शेतकऱ्यांवर जबरदस्ती केली जात नव्हती.जो पर्यंत शेतीचे पीक हाती येत नाही तो पर्यंत कर लावू नये असा नियम महाराजांनी केला होता.स्वराज्यात हा नियम काटेकोरपणे पाळला जात होता.

**ठोक कर पद्धती :**

बागायत,जिरायत, डोंगरी अशा जमिनीच्या प्रकारानुसार तसेच पिकानुसार ठोक कर आकारला जात होता. या कर पद्धतीमुळे सरकारी कारभारी आपली मनमानी करू शकत नव्हते.

**कर्जमाफी व सोई - सवलत :**

शेतकऱ्यांनी जुन्या सावकारांकडून घेतलेली कर्जे माफ करून त्यांना स्वराज्याकडून अल्पदराने कर्ज दिले जात असत.दुष्काळ किंवा शत्रूच्या संकटानंतर नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना बि-बियाणे,बैल,शेतीची अवजारे जसे की नांगर इत्यादीचे वितरण मोफत किंवा नाममात्र दराने केले जात होते.

**शेतीसाठी जलसिंचन :**

पिण्याच्या पाण्याबरोबर शेतीच्या पाण्याचा विचार सुद्धा महाराजांनी केला होता.शेतीसाठी धरण तसेच कालव्यांची व्यवस्था केलेली दिसून येते. नद्यांवर ठिकठिकाणी लहान बंधाऱ्यांची निर्मिती करून तेथे जमलेले पाणी शेती करण्यासाठी वळवले जात होते.विविध किल्ल्यांवर पाण्याची व्यवस्था केली होती.त्याच प्रमाणे किल्यांच्या खालच्या गावांमध्ये विहिरी,तलाव,बंधारे बांधून या पाण्याचा योग्य वापर होण्यासाठी व देखभालीसाठी गाव पातळीवर समित्या नेमल्या.

**वनसंरक्षण आणि शेतीचा विस्तार :**

वनामुळे पाऊस आणि जमिनीची सुपीकता टिकून राहते म्हणून स्वराज्यातील डोंगराळ भागात जंगल कटाई करण्यास सक्त मनाई होती.नवीन वस्ती,गावे किंवा कृषीकरीता डोंगरकपारी करतांना ती नियोजनबद्ध पद्धतीने केली जात होती.

**शेतकऱ्यांचे संरक्षण :**

शत्रूच्या स्वाऱ्यांमध्ये शेतकऱ्यांचे,रयतेचे नुकसान टाळण्यासाठी त्यांना व त्यांच्या घरी आलेल्या पिकांना सुरक्षित ठिकाणी हलवले जात असे.सुरक्षित ठिकाणी किंवा गडकिल्ल्यांवर धान्यसाठे नेहमी तयार ठेवले जात होते.ते वेळप्रसंगी रयतेच्या कामी येईल,रयत उपाशी राहणार नाही.याची काळजी महाराजांनी घेतली होती.

**सैन्याचे नियम :**

शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्याला कठोर आदेश दिले होते की 'शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका', शेतातून सैन्य गेल्यास पिकाचे नुकसान करू नये.सैन्याला चारा किंवा धान्य लागल्यास ते त्यांनी शेतकऱ्यांकडून विकत घ्यावे.फळांची झाडे तोडण्यास बंदी होती.युद्धकाळात शत्रूंच्या राज्यातील शेतकरी असो की कष्टकरी त्यांना त्रास दिला जात नव्हता.स्वारीच्या प्रसंगी सामान्य जनतेला त्रास देऊ नये असा महाराजांचा नियम होता.

**शेतकऱ्यांना सैन्यात स्थान:**

शेतकरी,कष्टकरी समाजातील बहुसंखेने लोक शिवरायांचे मावळे म्हणून स्वराज्याच्या सैन्यात सहभागी झाले होते.साधारणत: आठ महिने स्वराज्यासाठी युद्ध केल्यानंतर ते पुन्हा शेतीकडे परत येऊन जवळपास चार महिने शेतीत काम करीत असत.शेतकरी हा सैन्याचा व स्वराज्याचा एक अविभाज्य भाग होता.

**शिवरायांचा मूलमंत्र :**

शिवाजी महाराजांचा मूलमंत्र हा त्यांच्या राजमुद्रेवरून लक्षात येते.महाराजांचा मूलमंत्र म्हणजे 'लोककल्याण' होय.हे स्वराज्य लोककल्याणासाठीच आहे असे विचार महराजांचे होते.स्वराज्यातील शेतकरी सुखी असेल तर स्वराज्य सुखी आणि स्वराज्य सुखी असेल तरच स्वराज्य टिकेल.असे महाराजांना वाटत होते.महाराजांनी जे लोककल्याणकारी स्वराज्य निर्माण केले ते फक्त तलवारीच्या धारेवर नाही तर शेतकरी,रयतेच्या कष्टाला व विश्वासाला न्याय देऊन निर्माण केले होते.रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराजांचे असे विचार होते की शेतकरी हाच खऱ्या अर्थाने रयतेचा राजा आहे.

**निष्कर्ष**

छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषीविषयक विचार हे एकविसाव्या शतकात सुद्धा आदर्श आहे. कारण तर त्यात शेतकरी-कृषी केंद्रित अर्थव्यवस्था,आपत्ती व्यवस्थापन,आदर्श करप्रणाली,जल संवर्धन,पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक न्यायाचा चांगला समन्वय आहे.त्यामुळेच स्वराज्यात शेतीचा विकास होऊन शेती समृद्ध झाली आणि राज्याची आर्थिक स्थिती मजबूत झाली.आजच्या स्पर्धात्मक काळात शेतकऱ्यांचा विकास करायचा असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या कृषीविषयक विचारांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

1. कृष्णाजी अनंत सभासद, "आद्य छत्रपती श्री शिवाजीराजे यांची बखर", (१६९७ )
2. जयसिंगराव पवार, "शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे", मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे (२००५)
3. कवींद्र परमानन्द, "श्रीशिवभारत", नचिकेत प्रकाशन, नागपूर (२०१६)
4. नामदेवराव जाधव, "शिवाजी महाराजांचे अर्थशास्त्र",राजमाता प्रकाशन,मुंबई (२०१३ )
5. महात्मा ज्योतीराव फुले, "छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा",शब्दालय प्रकाशन,अहिल्यानगर (२०२०)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

6. विलास सोनावणे, “रयतेचा राजा”,लोकायत प्रकाशन,सातारा (२०१०)
7. प्रदीप सोळुंके, “शेतकऱ्यांचा राजा शिव छत्रपती” बळीवंश प्रकाशन,औरंगाबाद (२०११)
8. ग.शं.खोले, “शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची शिवचरीत कथनमाला” इंद्रायणी साहित्य,पुणे (१९९७)
9. डॉ.पी.एस.जगताप, “शिवरायांचे राज्यप्रशासन” वरदा प्रकाशन प्रा.लि.,पुणे (२०२३)
10. “छत्रपती शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र”
11. Narasinha Chintaman Kelkar and Dattatraya Vishnu Apte,‘ENGLISH RECORDS ON SHIVAJI (1659-1682’,Shiva Charitra Karyalaya,Poona (1931)
12. Dennis Kincaid,“SHIVAJI The Grand Rebel”,Rupa Publications India Pvt.Ltd,New Delhi (2015)